**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-७**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-१०/८/२०१२

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.७ मंगळवार दि.१४/८/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**मंगळवार दिनांक- १४/८/२०१२ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| ३० | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३ सोमवार दिनांक ३०/४/२०१२ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-४ बुधवार दिनांक २३/५/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ३१ | अहमदनगर महानगरपालिका नगररचना योजना क्रमांक ४ येथील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज-२ सावेडी भाजी मार्केट येथील पहिल्या मजल्यावरील हॉल सह. दुय्यम निबंधक वर्ग- १ व २ यांना कार्यालयासाठी जागा भाडे तत्वावर अटी व शर्तीनुसार देणेस तसेच पुर्वीचे मा.स्थायी समिती ठराव क्र. २८ दि. १६/८/२०११ व ठराव क्र. १०० दि.११/३/२०११ रद्द करणेबाबत.ऑफिस रिपोर्ट मंजूरीस |
| ३२ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे RGNM /RANMप्रशिक्षणार्थीना प्रसुती व स्त्री रोगाबाबत अनुभव घेण्यासाठी अर्जदार डॉ.रमेश ढाकणे पाटील, स्कुल ऑफ नर्सिंगच्या नेवासा फाटा यांना प्रति विद्यार्थी /प्रति दिन / प्रति खाट रू.१०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन दोन खाटासाठी रू.२०/- या प्रमाणे शुल्क आकारून परवनागी देणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीचे कामासाठी नियुक्त केलेल्या पथकास दिनांक २३/५/२०१२ चे पुढील सहामहिन्याकरिता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये रू.२,९६,०००/- मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ३४ | अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील अमरधाम रोड वेताळ बाबा मंदिर ते एम.एस.ई.बी. सबस्टेशन पर्यत रस्त्याचे रूंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ३५ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना , रक्तपेढी विभाग तसेच फिरता दवाखाना या अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमावयाच्या वैद्यकीय अधिकारी / रक्त संक्रमण अधिकारी या पदांचे दरमहा मानधन वाढविणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ३६ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा व बांधकाम विभागाकडील अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमावयाच्या कनिष्ठ अभियंता या पदाचे दरमहा मानधन वाढविणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ३७ | अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी डॉ. श्री. सुरेश विलास घोलप यांची कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३८ | महासभा ठराव क्र.१२ दिनांक ११/०७/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP)अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती करीता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव. |
| ३९ | अहमदनगर महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रामध्ये (बाहय रूग्ण विभाग) कार्यानुभव व प्रात्यक्षिका करिता अहमदनगर जिल्हयातील व नगर शहरातील विविध नर्सिंग इन्स्टिटयूट प्रशिक्षणार्थीना परवानगी देणेस व त्यांच्या कडून प्रती दिन प्रती विद्यार्थी फि ठरविणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- १] विषय क्र. ३० - मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३ सोमवार दिनांक ३०/४/२०१२ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-४ बुधवार दि. २३/५/२०१२ रोजीच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- ३१ ते ३९ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७**

विषय क्रमांक- ३० मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

ठराव क्रमांक- ३० मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३ सोमवार दिनांक ३०/४/२०१२ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-४ बुधवार दिनांक २३/५/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३ सोमवार दिनांक ३०/४/२०१२ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-४ बुधवार दिनांक २३/५/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मागील सभा क्रमांक-३ दिनांक ३०/४/२०१२ व सभा क्रमांक-४ दिनांक २३/५/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा. सौ. गायकवाड नि.व. :- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-मा.स्थायी समिती सभा क्र.३ दिनांक ३०/४/२०१२ व सभा क्रमांक ४ दिनांक २३/५/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३ सोमवार दिनांक ३०/४/२०१२ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-४ बुधवार दिनांक २३/५/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंतराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७**

विषय क्रमांक- ३१ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

ठराव क्रमांक- ३१ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका नगररचना योजना क्रमांक ४ येथील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज-२ सावेडी भाजी मार्केट येथील पहिल्या मजल्यावरील हॉल सह. दुय्यम निबंधक वर्ग- १ व २ यांना कार्यालयासाठी जागा भाडे तत्वावर अटी व शर्तीनुसार देणेस तसेच पुर्वीचे मा.स्थायी समिती ठराव क्र.२८ दि.१६/८/२०११ व ठराव क्र. १०० दि.११/३/२०११ रद्द करणेबाबत ऑफिस रिपोर्ट मंजूरीस.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा मार्केट विभाग जा.क्र. ३५ दि.११/५/२०१२

प्रस्तावना- विषय :- नगररचना योजना क्रमांक ४ येथील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज-२ सावेडी भाजी मार्केट येथील पहिल्या मजल्यावरील हॉल सह. दुय्यम निबंधक वर्ग -१ व २ या कार्यालयासाठी जागा भाडे तत्वावर मिळणेबाबत.

उपरोक्त विषयांस अनुसरून सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे. मा. सह. दुय्यम निबंधक वर्ग-१ ,अ.नगर यांचे अर्जानुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.२८ दिनांक १६/८/२०११ अन्वये मा. नगररचनाकार यांनी ठरविलेल्या रूपये १४००२.०० दरमहा भाडे तत्वावर ८७.५१ चौ.मी. जागा भाडे कराराने देणेबाबत ठराव पारित झालेला आहे. त्या अनुषंगाने संबंधीतास भाडे करारनामा करणेकामी समक्ष व पत्रान्वये कळविण्यांत आलेले आहे. त्या अनुषंगाने त्यानी दिनांक १७/३/२०१२ रोजी अर्ज देवून कळविले की, सदरची जागा नोंदणी महानिरीक्षक पुणे यांनी सरिता-३ प्रणाली साठी ठरविलेल्या मापदंडानुसार अपुर्ण आहे. त्यामुळे उक्त ठराव रद्द करणेबाबत विनंती करून भाजी मार्केट व्यापारी संकुलामधील संपुर्ण जागा (अंदाजे ४००० चौ.फुट) दोन कार्यालयासाठी ५ वर्षे कालावधीसाठी देणेस विनंती केलेली आहे.

सदरची मागणी केलेली जागा यापुर्वी मा.स्थायी समिती ठराव क्र. १०० दिनांक ११/३/२०११ अन्वये मा. नगररचनाकार यांनी ठरविलेल्या दरमहा भाडे रू.४३,३१४/- नुसार भाडे कराराने देणेबाबत ठराव पारित झालेला आहे. त्यानुसार संबंधीतास करारनामा करणेकामी पत्र व अंतीम नोटीस देवुनही या कार्यालयाशी संर्पक साधणेत आलेला नाही. त्यामुळे मा.स्थायी समिती ठराव क्र. १०० दिनांक ११/३/२०११ चा रद्द करणे योग्य होईल.

उक्त दोन्हीही अनुक्रमे ठराव क्र. २८ दिनांक १६/८/२०११ व ठराव क्र.१०० दिनांक ११/३/२०११ रदद करून मा. सह. दुय्यम निबंधक वर्ग-१ व २ यांचे दिनांक १७/३/२०१२ च्या अर्जानुसार व मा. नगररचनाकार यांनी जा.क्र. टी.पी.४०२ दि.२/५/२०१२ मध्ये नमुद केले नुसार दरमहा भाडे रू.२१५/- चौ.मी. नुसार सोबत जोडलेल्या अटी व शर्तीनुसार देणेबाबत मा.स्थायी समितीने निर्णय घेणे योग्य होईल आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- नगररचना योजना क्रमांक ४ सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज-२ सावेडी भाजी मार्केट येथील पहिल्या मजल्यावरील हॉल भाडे तत्वावर देणे व पुर्वीचे मा.स्थायी समिती ठराव क्र.२८ दि.१६/८/२०११ व ठराव क्र. १०० दि.११/३/२०११ रद्द करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २८ दिनांक १६/०८/२०११ व ठराव क्रमांक १०० दिनांक ११/०३/२०११ मधील काय रद्द करणे आहे.

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडमः- मा.सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग - १ अहमदनगर यांना मा.स्थायी समिती ठरावान्वये मा.नगररचनाकार यांनी ठरविल्यानुसार रु. १४,००२/- दरमहा भाडे तत्वावर ८७.५० चौ.मी. जागा कराराने देणेचा ठराव क्र.२८ दि.१६/८/२०१२ चा झालेला आहे. त्यांच्या मापदंडानुसार ती जागा अपुर्ण आहे. त्यामुळे उक्त ठराव रद्द करणे बाबत विनंती करुन भाजी मार्केट व्यापारी संकुलामधील अंदाजे ४००० हजार चौरस फुट जागा त्यांनी मागणी केलेली आहे. यानुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.१०० दिनांक ११/३/२०११ चे ठरावाप्रमाणे दरमहा भाडे रु.४३,३१४/- नुसार भाड्याने देणे बाबतचा ठराव केलेला आहे. करारनामा करणे बाबत त्यांना पत्र देवुनही त्यांनी संपर्क साधलेला नाही. सदरचे मा.स्थायी समिती ठराव क्र.२८ दि.१६/८/२०१२ व ठराव क्र.१०० दि.११/३/२०११ चे ठराव रद्द करून अर्जदार यांचे दिनांक १७/०३/२०१२ चे पत्रानुसार नगररचनाकार यांनी ठरविले प्रमाणे दरमहा भाडे रु. २१५/- प्रती चौ.मीटर आकारुन जागा देणे योग्य होईल. त्यांचे मागणी नुसार जागा बदललेली आहे. त्यानुसार भाडे वाढलेले आहे दर तोच आहे.

मा.श्री.बोरूडे अ.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ.गंधे सु.मो.:- दरमहा रूपये २१५/- प्रती चौ.मी. भाडे आकारून अर्जदार यांना पांच वर्षासाठी जागा भाडे कराराने देण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-दरमहा दर चौरस मिटरला रक्कम रु.२१५/- प्रमाणे भाडे आकारुन जागा भाडे तत्वावर देण्यात यावी. पांच वर्षे कालावधीसाठी देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका नगररचना योजना क्रमांक-४ सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज-२ सावेडी भाजी मार्केट येथील पहिल्या मजल्यावरील हॉल सह. दुय्यम निंबधक वर्ग-१ व २ यांना कार्यालयासाठी दरमहा भाडे रूपये २१५/- (रूपये दोनशे पंधरा फक्त) प्रती चौरस मीटर प्रमाणे अटी व शर्ती नुसार पांच वर्षे कालावधीसाठी भाडे कराराने देणेस व मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०० दिनांक ११/३/२०११ व ठराव क्रमांक २८ दिनांक १६/८/२०११ चे ठराव रद्द करणेस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बोरूडे अनिल वसंतराव सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७**

विषय क्रमांक- ३२ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

ठराव क्रमांक- ३२ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे RGNM /RANMप्रशिक्षणार्थीना प्रसुती व स्त्री रोगाबाबत अनुभव घेण्यासाठी अर्जदार डॉ.रमेश ढाकणे पाटील, स्कुल ऑफ नर्सिंग नेवासा फाटा यांना प्रति विद्यार्थी /प्रति दिन / प्रति खाट रू.१०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन दोन खाटासाठी रू.२०/- या प्रमाणे शुल्क आकारून परवनागी देणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह दि.७/५/२०१२

विषय- RGNM / RANM प्रशिक्षणार्थीना प्रसुती व स्त्री रोगाबाबत अनुभव घेण्यासाठी कै.बा. दे. दवाखान्यात परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ:- No.RDP/332/2012 Dr.Ramesh Dhokane Patil School Of Nursing near Aurangabad Highway, Newasa Phata Dist. Ahmednagar Date.23/04/2012

सादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट की, डॉ.रमेश ढोकणे पाटील स्कुल ऑफ नर्सिंग , नेवासा फाटा, अहमदनगर यांनी त्यांच्या संस्थेतील RANM / RGNM प्रशिक्षणार्थीना प्रसुती, आंतररूग्ण विभागामध्ये अनुभव मिळण्यासाठी कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे परवानगी मिळणेबाबत अर्ज केला आहे. त्या करिता शासकीय नियमानुसार फी भरण्यास सदर संस्था तयार आहे.

सर्व प्रशिक्षणार्थी प्रसुतीपूर्व कक्ष, प्रसुती पश्चात कक्ष, बाह्य रूग्ण विभाग, शस्त्रक्रियागार विभाग व प्रसुती कक्ष कक्ष या विभागात प्रत्यक्ष अनुभव घेतील व त्यांच्या समवेत सिस्टर टयुटर त्यांना प्रसुती कार्यानुभव शिकवतील.

सदर संस्थेस मान्यता देणेसाठी शासन निर्णय क्रमांक एमईडी- २००९ सीआ-१२३/०९ शिक्षण-१ वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई-३२ दिनांक २५ ऑगस्ट २००९ अन्वये रूग्णालयीन चिकित्सालयीन सुविधा शैक्षणिक प्रयोजनार्थ वापरण्यास प्रती विद्यार्थी / प्रती दिन / प्रती खाटेसाठी खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. सदर शुल्क अभ्यासक्रमासाठी मंजुर विद्यार्थी प्रवेश क्षमतेनुसार आकारण्यात येईल. सदरच्या संस्थेच्या २०-२० च्या गटाने विद्यार्थीनींची बॅच सहा महिन्याकरिता दवाखान्यामध्ये प्रशिक्षण घेण्याकरिता येईल.

| अ.नं. | अभ्यासक्रम नांव | शुल्क |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय, दंत , आयुर्वेद , होमिओपॅथी पदवी अभ्यासक्रम | रूपये २५/- |
| २ | भौतिकोपचार, व्यवसायोपचार यासारखे निमवैद्यकीय अभ्यासक्रम | रूपये १५/- |
| ३ | परिचार्या विषयक पदवी / पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम | रूपये १०/- |

तरी सदर संस्थेस शासन निर्णयाप्रमाणे RANM / RGNM प्रशिक्षणार्थींना प्रसुती व स्त्रीरोगाबाबत अनुभव घेण्यासाठी प्रति विद्यार्थी / प्रति दिन / प्रति खाट रू.१०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन दोन खाटासाठी रू.२०/- याप्रमाणे खालील अटी व शर्तीवर परवानगी देणे उचित वाटते.

**<u>अटी व शर्ती</u>**

१] कै.बा.दे.दवाखाना येथे प्रामुख्याने प्रसुती होतात. येथे १०० खाटांची सोय असुन दरमहा अंदाजे सरासरी ३०० पर्यत बाळांतपणे होतात. त्यासाठी प्रशिक्षणार्थीना गट करून पाठविणे आवश्यक आहे.
२] प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या शिक्षकाची (टयुटर ) व्यवस्था संबंधीत संस्थेने केली पाहिजे. प्रशिक्षणार्थीवर नियंत्रण ठेवणे ही टयुटरची जबाबदारी राहील. टयूटरने प्रत्येक प्रशिक्षणाच्या वेळी हजर असणे आवश्यक आहे.
३] प्रशिक्षण कालावधीत त्यांचे डयुटी संबंधी इन्चार्ज स्त्री वैद्यकीय अधिकारी किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्या संमतीने व सुचनेप्रमाणे संबंधीत संस्थेस व्यवस्था करावी लागेल.
४] प्रशिक्षणासाठी परवानगी दिल्यानंतर प्रत्यक्षात प्रशिक्षण सुरू करण्यापुर्वी विहित नमुन्यात करारपत्र सदर संस्थेच्या वतीने जबाबदार पदाधिका-यांनी स्वाक्षांकित करून द्यावे लागेल. तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक ती मान्यता इंडीयन नर्सिंग कौंसिलच्या सक्षम अधिका-याकडुन घेण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.
५] सदरची परवानगी तात्पुरत्या स्वरूपाची असुन जास्तीत जास्त ५ वर्षाच्या कालावधीसाठी देण्यांत येईल. मात्र सदर परवानगीचे दरवर्षी नुतनीकरण करून घेणे अपरिहार्य राहील.
६] कराराच्या कालावधीत संस्थेने पुढील प्रत्येक ३ महिन्याच्या कालावधीचे शुल्क पहिल्या महिन्याच्या १० तारखेपर्यत अग्रीम स्वरूपात महानगरपालिकेकडे जमा करावे. विहित शुल्क जमा केल्यानंतरच प्रशिक्षणार्थींना पाठविण्यांत यावे.
७] प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण कालावधीमध्ये रूग्ण सेवेवर तसेच रूग्णालयाच्या प्रशासनावर कोणताही परिणाम होणार नाही याची दक्षता सदर संस्थेने घ्यावी.
८] प्रशिक्षण काळात संबंधीत संस्थेचे प्रशिक्षणार्थी रूग्णालयाच्या बाहेर फिरतांना किंवा बाहेर गेल्यास टयुटरला जबाबदार धरण्यात येईल व प्रशिक्षण थांबविण्यात येईल.
९] प्रत्येक विद्यार्थ्यास अनुभवासाठी प्रतिदिन दोन खाटा उपलब्ध करून दिल्या जातील.

तरी त्यांचे विनंती अर्जानुसार शासन निर्णयाप्रमाणे नर्सिंग स्कुलच्या प्रशिक्षणार्थींना प्रसुती व स्त्री रोगाबाबत अनुभव घेण्यासाठी प्रति विद्यार्थी / प्रति दिन / प्रति खाट रू.१०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन दोन खाटासाठी रू.२०/- या प्रमाणे वरील बार्बीचा विचार होउन त्या संस्थेकडुन शुल्क आकारणी करून मान्यता देण्यांस हरकत नाही आदेशार्थ सादर.
सोबत-शासन निर्णय जोडला आहे.

येणे प्रमाणे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा अहवाल असे.

--**--

यावर एम.ओ.एच. यांचा अभिप्राय की,"अ"प्रमाणे डॉ.रमेश ढोकणे,स्कुल ऑफ नर्सिंगच्या विदयार्थीना शासकीय निर्देशानुसार कै.बा.दे.दवाखाना येथे अनुभवासाठी मान्यता देणे विहीत मुदतीसाठी शुल्क आकारून योग्य वाटते तरी निर्णयास्तव मा.स्थायीसमितीपुढे विषय घेणेस आदेशार्थ सादर.

यावर मुलेप/ मुलेअ यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे शासन निर्णयानुसार नर्सिंग स्कुलच्या प्रशिक्षणार्थीना प्रसुती व स्त्री रोगाबाबत अनुभवासाठी प्रति विद्यार्थी प्रति दिन प्रति खाट रू.१०/- प्रतिदिन दोन खाटासाठी रू.२०/- प्रमाणे संबंधीत संस्थेकडुन शुल्क आकारणी करून परवानगी देणेस मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही १९/५/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--ooo--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे प्रशिक्षणार्थीना शुल्क आकारून प्रशिक्षण देणेस परवानगी देणे बाबत प्रस्ताव आहे प्रस्तावाची माहिती सांगावी.

डॉ.श्री.राजुरकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी :- डॉ.रमेश ढाकणे पाटील, स्कुल ऑफ नर्सिंग नेवासा फाटा यांनी त्यांच्या संस्थेतील आर.ए.एन.एम. व आर.जी.एन.एम. प्रशिक्षणार्थीना प्रसुती व आंतररुग्ण विभागामध्ये अनुभव मिळणेसाठी परवानगी मिळणे बाबत अर्ज केलेला आहे. मा.शासनाने ठरवुन दिलेल्या दरानुसार आपण त्यांचेकडुन प्रतिविद्यार्थी फी घेवुन त्यांना परवानगी देणेस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव सादर केला आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- यापुर्वीही काही संस्थेच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्क आकारुन परवानगी देण्यांत आलेली आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.कवडे उ.खं.:- नियमानुसार फी भरुन घेवून परवानगी देणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे प्रसुती व स्त्रीरोगाबाबत अनुभव घेण्यासाठी परवानगी देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे RGNM /RANM प्रशिक्षणार्थीना प्रसुती व स्त्री रोगाबाबत अनुभव घेण्यासाठी अर्जदार डॉ.रमेश ढाकणे पाटील, स्कुल ऑफ नर्सिंग, नेवासा फाटा यांना प्रति विद्यार्थी /प्रति दिन / प्रति खाट रू.१०/- (रूपये दहा फक्त) प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन दोन खाटासाठी रू.२०/- (रूपये वीस फक्त) या प्रमाणे शुल्क आकारून परवनागी देणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही/-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिति
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७**

विषय क्रमांक- ३३ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

ठराव क्रमांक- ३३ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीचे कामासाठी नियुक्त केलेल्या पथकास दिनांक २३/५/२०१२ चे पुढील सहामहिन्याकरिता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये रू.२,९६,०००/- मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा नगररचना विभाग दिनांक ८/५/२०१२

विषय- अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीचे कामासाठी नियुक्त केलेल्या पथकास मुदतवाढ मिळणेबाबत.

सादर,

अहमदनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या नोंदी बाबत करावयाच्या कामकाजासाठी सेवा निवृत्त तहसिलदार / नायब तहसिलदार /२ भुकर मापक स्थावर मिळकत व्यवस्थापन पथकाची नियुक्तीस स्थाई समिती ठराव क्रमांक ५६ दिनांक १५/११/२०११ अन्वये सहा महिनेकरिता मुदतवाढ देणेत आली होती. सदरची मुदत दिनांक २२/५/२०१२ रोजी संपत आहे. पथकाने आतापर्यत केलेल्या व शिल्लक कामाची माहिती सोबतच्या तक्त्यांत दर्शविलेली आहे. त्यांचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास येते.

एकूण मिळकतीची माहिती

| **अ.नं.** | **तपशील** | **जागा** | | **रस्ते** | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | क्षेत्र हे. आर. | संख्या | क्षेत्र हे.आर. |
| १. | महानगरपालिका हद्दीतील सर्व इमारती, क्रिडांगण, शाळा, बगीचे, मैदाने, सभागृह, दवाखाने, रेखांकनातील जागा न.र.यो.मधील अंतीम भुखंडामधील जागा, पिंपळगांव माळवी तलावाची संपादीत केलेली जमिन इ. क्षेत्र | १४९८ | ४५३.४४ | १२०६ | १९२.८५ |
| २. | ३०/४/२०१२पर्यंत म.न.पा.च्या नोंदी झालेल्या मिळकती | ८८४ | ११७.१० | ८६९ | १५०.४३ |
| ३. | नोंदी करावयाच्या शिल्लक मिळकती | ६१४ | ३३६.३४ | ३३७ | ४२.४२ |

*** केलेल्या कामाच तपशिल**

१] खुल्या जागा ८८४ रस्ते ८६९ एकुण १७५३ मिळकतीवे ७/१२ उत्तारे, सिस उत्तारे, खरेदीखत सुची २ , तांबे पावत्या / पंचनामा ताबेपावती इत्यादी प्राप्त करून घेवुन त्या प्रमाणे संबंधीत खात्याकडे प्रकरणे पाठवुन एकुण ८८४ खुल्या जागा व ८६९ रस्ते अशा एकूण १७५३ मिळकतींना महानगरपालिकेचे नांव लावणेचे काम पुर्ण केले आहे.

२] नगर रचना योजना क्र.४ मधील अंतीम भुखंड क्रमांक १११,१९३ व १९५ सि.स.नं. ४७७० अ , ४२१ अ,मिळकतीबाबत भूमि अभिलेख खात्याकडे अपील दाखल केले आहे.

३] अतिक्रमण , बांधकाम , पाणी पुरवठा , नगररचना विभागाकडून प्राप्त झालेल्या एकुण ३७ प्रकरणातील ६५५मिळकतींची पथकातील भुकरमापक यांनी मोजणी प्रमाणे हदी निश्चित करून संबंधीत विभागास अहवाल सादर केला आहे. तसेच त्यांनी बालिकाश्रम ते सावेडी आडतेबाजार ते झेंडीगेट, दिल्लीगेट ते जिल्हाधिकारी कार्यालय, या रस्त्यांची वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे मोजणीचे काम केले आहे. नालेगांव स नं.२२० व २२१ मधील १७ एकर क्षेत्राची मोजणी करून गोसावी व ख्रिश्चन समाजाच्या स्मशानभुमीच्या हदी निश्चित करून दिल्या आहेत.

*** करावयाची शिल्लक कामांचा तपशिल.**

१] सन १९९९ पुर्वीचे मंजुर रेखांकनातील २०५खुल्या व २८१ रस्ते असे एकुण ४८६ तसेच नगर रचना योजना क्र.३ व ४ मधील मंजुर रेखांकनातील ९५ खुल्या जागा व ३८ रस्ते अशा एकुण १३३ मिळकतीस नोंदी करावयाच्या आहेत. त्यासाठी संबंधीत मिळकतीचे ७/१२ उतारे, ताबे पावत्या / पंचनामा ताबे पावत्या सिसकडील आवश्यक त्या मिळकत पत्रिकांचे उतारे प्राप्त करून घेवुन नोंदी साठी प्रकरणे महसुल व नगर भुमि अभिलेख खात्याकडे पाठवुन नोंदीचे काम करून घ्यावयाचे आहे.

२] नगररचना योजना क्र.४ मधील अंतीम भुखंड क्र.१११,१९३ व १९५ व सिटी सर्व्हे नंबर ४७७०अ, ४२१अ मधील मिळकतीबाबत मा.उपसंचालक भुमि अभिलेख नाशिक प्रदेश नाशिक यांचेकडे केलेल्या अपीलातील कामकाज करावयाचे आहे.

३] शासनाने मंजुर केलेल्या नगर रचना योजना क्र.१ व २ मधील भुखंडास अदयाप भुमिअभिलेख अधिकार अभिलेखात योजनेचा अम्मल घेतलेला नाही याबाबत भुमि- अभिलेख खात्याबरोबर पत्रव्यवहार व त्याप्रमाणे पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

४] दुसरी सुधारित मंजुर व प्रस्तावीत विकास योजनेतील आरक्षित केलेल्या प्रयोजनासाठी शासकीय जागेची मागणी केलेली आहे याबाबत महसुल विभागाशी पत्रव्यवहार करून जागा हस्तांतरीत करून घेणे बाबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

५] तपोवन रस्ता विकास योजनेप्रमाणे २४ मिटर रूंद करणेसाठी स.नं. ४५/ २ ब मधील क्षेत्र संपादन करणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडेस सादर केलेला आहे. संपादनाची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर त्यामध्ये आवश्यक ती कार्यवाही करावी. लागणार आहे.

६] सावेडी गांवठाण व त्यालगतचे क्षेत्रासाठी सिटी सर्वे लागु करणे बाबतचा प्रस्ताव नगर भुमापन अधिकारी अहमदनगर यांचेकडे पाठविला होता त्यामध्ये त्यानी मोजणी फी भरणे बाबत कळविलेले आहे मोजणी फी भरलेनंतर सिटी सर्व्हे लागु करणेचे कामकाजात पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

७] फकिरवाडा, मुकुंदनगर , दर्गादायरा , क्षेत्रासाठी सिटी सर्वे लागु करणे बाबतचा प्रस्ताव नगर भुमापन अधिकारी अहमदनगर यांचेकडे पाठविला होता. त्यामध्ये त्यांनी या भागातील मिळकत धारकांची माहिती मागविलेली आहे. त्या ठिकाणच्या एकुण ५०००/- पर्यत मिळकतीची माहिती सदर करावयाची आहे.

८] पिंपळगाव माळवी येथील तलावासाठी संपान केलेल्या ७०० एकर क्षेत्रास मनपाचे नांवाची नोंद करणे बाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडेस सादर केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख अहमदनगर यांचे अभिप्राय मागविला आहे तो अदयाप प्रलंबित आहे.

या मध्ये मा.जिल्हाधिकारी यांचेकडील यांचेकडील आदेश प्राप्त झालेनंतर आवश्यक ती कार्यवाही करणेसाठी महसूल विभागातील संबंधीत तहसिलदार, मंडळाधिकारी, कामगार तलाठी व भुमि अभिलेख खाते यांचेशी पत्रव्यवहार करून ७/१२ ला महानगरपालिकेच्या नांवाची नोंद करणे बाबतची कार्यवाही करावी लागणार आहे.

९] पिंपळगांव माळवी येथील संपादीत क्षेत्रास महानगरपालिकेचे नावांची नोंद झालेनंतर मोजणी करून हदी निशाणी निश्‍चित करून घ्याव्या लागणार आहेत व मोजणी अंती क्षेत्रात चुक आढळलेस त्यामध्ये दुरूस्ती बाबत कार्य करणे व अतिक्रमणे असल्यास ती दुर करणे बाबतची कार्यवाही करावी लागणार आहे.

१०] महानगरपालिकेच्या नावांची नोंद झालेल्या सर्व खुल्या जागांची मोजणी करून घेवुन रेकॉर्ड प्रमाणे क्षेत्र बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी लागणार आहे त्यात तफावत असल्यास आवश्यक त्या दुरूस्त्या करणे बाबत संबंधीत खात्यासी पत्रव्यवहार करावा लागणार आहे.

स्थावर मिळकत व्यवस्थापन पथकातील अधिकारी / कर्मचारी हे नियमित कार्यालयात येवुन आतापर्यत त्यांनी काम समाधानकारक केले असुन नोंदीचे कामात प्रगती केलेली आहे. पालिकेच्या स्थावर मिळकतीचे कामकाजाबाबत त्यांना माहिती झालेली आहे त्यामुळे प्रस्तावात नमुद केलेली महत्वाचे करावयाचे कामकाज सुरळीत एकसुत्रिपणे व बिनचुक करणेसाठी हल्ली कार्यरत असलेल्या पथकास दिनांक २३/५/२०१२ पुढील सहा महिने कालावधीकरिता मुदतवाढ देणे आवश्यक वाटते.

कार्यरत असलेल्या पथकाची कमी दराची रक्कम रू.२,९६,०००/- स्थाई समिती ठराव क्रमांक १८ दिनांक २८/७/२००९ अन्वये मंजुर करणेत आलेली आहे. त्या रकमेच्या सरासरीप्रमाणे येणारी रक्कम रू.४९,३३०/- प्रमाणे दरमहा त्यांना अदा करणेत आलेली आहे. पुढील कालावधीकरिता ते वरिल मंजुर दरानेच काम करणेस तयार आहेत.

तरी स्थावर मालमत्ता नोंदीचे शिल्लक काम विचारात घेवुन त्या कामासाठी दिनांक २३/५/२०१२चे पुढील सहा महिन्याकरिता मुदतवाढ देणे व सहा महिनाकरिता येणारी खर्चाची रक्कम रू.२,९६,०००/- मानधन आस्थापना या शिर्षा खाली खर्च घालणेस मंजुरीसाठी मा.स्थायी समिती कडे प्रस्ताव सादर करणेस हरकत नाही.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

--**--

यावर मु.ले.प. याचां अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्ता नोंदीचे शिल्लक काम पुर्ण करण्याकरिता सध्या कार्यरत असलेल्या पथकास मा.स्थायी समिती ठराव क्र.१८ दि.२८/७/२०१२ पासून ६ महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात मुदतवाढ देणेस व त्याकामी येणा-या रक्कम रूपये २,९६,०००/- चे खर्चास मंजुरीसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस्तव सादर./**अ**

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही दि.१९/५/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--०००--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे स्थावर मिळकतीचे कामासाठी नियुक्त केलेल्या पथकास दिनांक २३/५/२०१२ चे पुढील सहामहिन्याकरिता मुदतवाढ देणे व खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीस महानगरपालिकेचे नांव लावणे करीता नियुक्त करण्यांत आलेल्या पथकाने आज पर्यंत किती मालमत्तांवर मनपाचे नावांची नोंदणी केली याबाबत माहिती देण्यांत यावी.

नगररचनाकार श्री.दहे:- सदर पथकाने महानगरपालिका हद्दीतील खुल्या जागा ८८४, रस्ते ८६९ अशा एकुण १७५३ मिळकतींचे ७/१२ उतारे खरेदी खत, ताबा पावत्या, पंचनामे इत्यादी प्राप्त करुन घेवुन त्याप्रमाणे संबंधित खात्याकडे प्रकरणे पाठवुन एकुण ८८४ खुल्या जागा व ८६९ रस्ते अशा एकुण १७५३ मिळकतींना मनपाचे नांव लावणेचे काम पुर्ण केलेले आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- महानगरपालिका मालकीचे पिंपळगांव माळवी तलावाची जागा आहे. सदर जागेवर महानगरपालिकेचे नावाची अद्याप नोंद झालेली नाही.

नगररचनाकार श्री.दहे :- पिंपळगांव माळवी येथील तलावाच्या ७०० एकर जागेस महानगरपालिकेच्या नावाची नोंद करणे बाबतचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडेस सादर केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी जिल्हा अधिक्षक भूमिअभिलेख अहमदनगर यांचे अभिप्राय मागितलेले आहेत. सदरचा प्रस्ताव भूमिअभिलेख यांचेकडेस प्रलंबित आहेत.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कवडे उ. खं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या स्थावर मिळकत व्यवस्थापन पथकास मुदतवाढ देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. ऑफिस रिपोर्ट खर्च मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या स्थावर मिळकत व्यवस्थापन पथकास दिनांक २३/५/२०१२ चे पुढील सहामहिन्याकरिता मुदतवाढ देणेस त्याकामीचे येणारे मानधन रक्कम रूपये रू.२,९६,०००/- (रूपये दोन लाख शहाण्णव हजार फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७**

विषय क्रमांक- ३४ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

ठराव क्रमांक- ३४ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील अमरधामरोड वेताळ बाबा मंदिर ते एम.एस.ई.बी.सबस्टेशन पर्यत रस्त्याचे रूंदीकरण,मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. जा.क्र.२६४ शह अभियंता दि.२२/५/२०१२

प्रस्तावना-विषय- फेर टेंडर नोटीस क्र.२ ई- निविदा क्र.१९७/२०११-१२ च्या निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव-महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील अमरधाम रोड वेताळ बाबा मंदिर ते एम.एस.ई.बी. सबस्टेशन पर्यत रस्त्याचे रूंदीकरण, मजुबतीकरण ,डांबरीकरण करणे.

उपरोक्त विषयाबाबत खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा.शासन निर्णय क्र.नगरो-२०१०/प्र.क्र.२४२/नवि-३३ मंत्रालय मुंबई ३२ यांचे दि.३१/३/२०११ अन्वये मंजुरी

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- ९८.७० लक्ष (रस्ता + विद्युत काम)

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- ७८,०३,४७५/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सा.बां. वि. म.जि.प्रा. २०१०-११

५] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- ७८,०३,४७५/-

६] निविदा प्रसिध्दी तारीख :- ई - निविदा क्र.१९४ ते १९९ दि.०१/०२/२०१२ दै. पुढारी (ई - निविदेबाबतची सुचना)

७] निविदा विक्री कालावधी :- दि. ०१/०२/२०१२ ते ०९/०२/२०१२

८] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. १३/०२/२०१२ ते दि. १६/०२/२०१२ अखेर

९] निविदा उघडण्याची तारीख :- दि. २८/०३/२०१२

१०] कामाची मुदत :- ६ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदा दरापेक्षा देकार |
|---|---|---|
| १ | मे. बेस्ट कंन्स्ट्र., कंपनी अहमदनगर | १७.९९% जादा दराने |

त्यानुसार वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने **मे. बेस्ट कंन्स्ट्र., कंपनी अहमदनगर** यांचा देकार सर्वात कमी म्हणजे **१७.९९% जादा** दराने आहे. निविदा धारकाने भरलेल्या दराची सन २०११-१२ सा.बां.वि.च्या सुधारित चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **५.०१%** जादा येत असुन तो अवाजवी असल्यामुळे दराचे वाटाघाटीसाठी मा.छाननी समिती समोर मा.उपायुक्त (सा) यांचे दालनात दि.२७/०४/२०१२ रोजी दु.४.००वाजता समक्ष उपस्थित राहणे अथवा अंतीम दराबाबत लेखी पत्र सादर करणेबाबत जा.क्र. सा.बां.वि.९६/२ दि.२६/०४/२०१२ अन्वयें पत्र दिले होते. त्यानुसार दि.२७/०४/२०१२ रोजी समक्ष दिलेल्या पत्रानुसार आम्ही सादर केलेले दर हे योग्य आहेत. आपली निविदा मार्च २०१२ पुर्वीची असल्याने मार्च (बजेटमध्ये) सरकारी सर्व करामध्ये वाढ झालेली आहे.

इंश्यरंन्स वेलफेअर टॅक्स ॲडीशनल आहे. महागाई Price Index मध्ये प्रचंड वाढ झालेली आहे.या सर्व बाबींचा विचार करता आंम्ही सादर केलेले निविदा दर हे योग्य आहेत १७.९९ % जादा दराने वरील रस्त्याचे काम करण्यास तयार आहे. तरी पुढील कार्यवाही होणेस पुन:विनंती आहे. अशा आशयाचे पत्र सादर केले आहे.

सदरचा तुलनात्मकतक्ता मा.छाननीसमोरदि.२७/४/१२रोजी ठेवला असता मा.छाननी समितीने उपरोक्त निविदेबाबत निर्णय घेणेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेबाबत शिफारस केलेली आहे.

**मे.बेस्ट कंन्स्ट्र., कंपनी** यांनी सदरचे काम निविदा दरापेक्षा **१७.९९% जादा** दराने करणेस दि.२७/४/२०१२ रोजीच्या पत्रान्वये तयारी दर्शविली असुन सन २०११-२०१२ सा.बां.वि.च्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **५.०१ % जादा** येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू.९२,०७,३२०/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां.वि.च्या २०११-१२अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू.८७,६८,०८२/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. ४,३९,२३८/- |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१४ x १००) / १२ | ५.०१% जादा |

तरी मा.छाननी समितीने उपरोक्त निविदेबाबत निर्णय घेणेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांनी दि.१८/०५/२०१२ रोजी मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील अमरधामरोड वेताळ बाबा मंदिर ते एम.एस.ई.बी.सबस्टेशन पर्यत रस्त्याचे रूंदीकरण,मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी आलेले कमीचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. कोतकर सु. स. :- सदरचा विषय मंजूर करणेत यावा.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बोरूडे अ. व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठरावः-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील अमरधाम रोड वेताळ बाबा मंदिर ते एम.एस.ई.बी. सबस्टेशन पर्यत रस्त्याचे रूंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर यांचे निविदा दरापेक्षा १७.९९% (सतरा पुर्णांक नव्याण्णव शतांश टक्के)जादाचे दरास म्हणजेच चालू दर सुचीनुसार ५.०१%(पांच पुर्णांक एक शतांश टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बोरूडे अनिल वसंतराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७**

विषय क्रमांक- ३५ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

ठराव क्रमांक- ३५ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना , रक्तपेढी विभाग तसेच फिरता दवाखाना या अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमावयाच्या वैद्यकीय अधिकारी / रक्त संक्रमण अधिकारी या पदांचे दरमहा मानधन वाढविणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा आस्थापना विभाग जाक्र.१५९ दिनांक १/६/२०१२

प्रस्तावाना- विषय- कै.बा. दे. दवा., रक्तपेढी विभाग तसेच फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी / रक्त संक्रमण अधिकारी या पदांचे दरमहा मानधन वाढविणेबाबत.

सादर,

मा. प्र. आरोग्याधिकारी यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बा. दे.दवा. रक्तपेढी विभाग तसेच फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदांवर अटी व शर्ती नुसार अनुक्रमे १] डॉ.सौ. कांचन रच्चा २] डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी ३] डॉ. सुरेश विलास घोलप यांची सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्दा नियुक्त्या करण्यांत येत आहे.

डॉ.सौ. कांचन रच्चा यांनी दि.१३/१/२०१२ रोजी अर्ज देवुन रू.१५,०००/- दरमहा मानधन कमी असुन रू.३५,०००/- इतके दरमहा मानधन वाढीबाबत तसेच डॉ. रूपाली कुलकर्णी यांनी दि.२३/४/२०१२ रोजी अर्ज देवुन रक्तपेढी विभाग वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदाचे मानधन दरमहा रूपये २०,०००/- कमी असुन त्यामध्ये ३०,०००/- मानधन मिळणे व डॉ. सुरेश विलास घोलप यांनी दि.४/२/२०१२ रोजी अर्ज देवुन रू.१०,०००/- हे दरमहा मानधन अत्यंत अल्प स्वरूपाचे असल्याने रू.२०,०००/- पर्यत मानधन वाढवुन मिळणेबाबत उपरोक्त अर्जामध्ये नमुद केलेले आहे.

वरील अर्जावर मा.प्र. आरोग्याधिकारी यांनी त्यांच्या मानधन वाढीचा निर्णयाबाबत मा.स्थायी समिती पुढे विषय चर्चेस्तव ठेवणे योग्य होईल असा अभिप्राया नमुद करून सुचित केलेले आहे.

डॉ.सौ. कांचन रच्चा यांची शैक्षणिक अर्हता एम.बी.बी.एस.डी.जी.ओ. (स्त्री रोग तज्ञ) व डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची शैक्षणिक पात्रता एम.बी.बी. एस. असुन डॉ. सुरेश विलास घोलप यांची शैक्षणिक पात्रता ही बी.ए.एम.एस. अशी धारण केलेली आहेत.

आस्थापना कायम सुची वरील वैद्यकीय अधिका-यांची मंजुर पद संख्या कमी असल्याने अत्यावश्यक सेवेचा विचार होवुन मा.प्र.आरोग्याधिकारी यांचे प्रस्तावामध्ये नमुद केल्याच्या अनुषंगाने त्यानुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना, रक्तपेढी विभागाकरीता कंत्राटी करारानुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर थेट पध्दतीने मुलाखती करीता करारबध्द नियुक्तीसाठी वेळोवेळी वर्तमान पत्रामध्ये व अहमदनगर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहिराती प्रसिध्दीस देण्यांत आलेल्या होत्या.

परंतु सदर प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने दरमहाचे मानधन कमी असण्याची शक्यता असल्याने उमेदवारांचा सदर तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदांकरीता कंत्राटी करारबध्द नियुक्तीसाठी थेट पध्दतीने मुलाखतीसाठी अत्यंत कमी प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

वरील अर्जाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे नमुद केल्यानुसार कंत्राटी करारानुसार दरमहा मानधनाबाबतचा तपशिल सादर करण्यांत येत आहे.

| अ.नं. | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | विभाग | सध्याचे कंत्राटी करारबध्द दरमहा मानधन | अर्जामधील मागणी दरमहा मानधन | आस्थापना कायम नियुक्ती करीता होणारे दरमहा पगाराचे वेतन | प्रस्तावीत कंत्राटी दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | कै.बा.दे. दवा. | १५,०००/- | ३५,०००/- | २५,९२५/- | २५,०००/- पर्यत |
| २. | वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी | रक्तपेढी | २०,०००/- | ३०,०००/- | २५,९२५/- | २५,०००/- पर्यत |
| ३. | वैद्यकीय अधिकारी | फिरता दवाखाना | १०,०००/- | २०,०००/- | २४,१७५/- | २०,०००/- पर्यत |

मा.स्थायी समितीच्या मंजुरी प्राप्ती नंतर त्यानुसार रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मा. प्र. आरोग्याधिकारी यांचे प्रस्तावामध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक त्या पदांच्या तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण या पदांचे दरमहा मानधन नमुद करून थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती आयोजित करीता पुनश्चः वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देणे उचित होईल.

तरी उपरोक्त वरील अर्जाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे अत्यावश्यक सेवेकरीता सदर करारबध्द नियुक्तीसाठी कै.बा.दे.दवा. करीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदांचे व रक्तपेढी विभागाकरिता आवश्यक त्या तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदांचे व फिरता दवाखान्या करीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदाचे दरमहा मानधन वाढ निश्चित करणेस मंजुरी करीता बाबतचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना , रक्तपेढी विभाग तसेच फिरता दवाखाना या अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमावयाच्या वैद्यकीय अधिकारी / रक्त संक्रमण अधिकारी या पदांचे दरमहा मानधन वाढविणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. जगताप नि. वि. :- कै.बा.दे.दवाखान्यासाठी नियुक्ती करावयाच्या वैद्यकीय अधिकारी यांचे पुर्वीचे मानधन किती होते.

आस्थापना प्रमुख श्री.सोनवणेः- कै.बा.दे.दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी यांना सध्या रक्कम रु. १५,०००/- मानधनावर नियुक्त केलेले आहे. तेथील डॉक्टरांनी विनंती अर्ज देवुन रक्कम रु. ३५,०००/- मानधनाची मागणी केलेली आहे. प्रस्तावामध्ये रक्कम रु.२५,०००/- व रूपये २०,०००/- प्रमाणे मानधन देणेस मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. जगताप नि. वि.:- प्रस्तावात सुचविलेल्या रक्कम रु.२५,०००/- ऐवजी रक्कम रु. २०,०००/- मानधन करा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेमधील डॉक्टरांना मानधन कमी असल्याने महानगरपालिकेमध्ये डॉक्टर येण्यास टाळाटाळ करतात.

मा.उपायुक्त (सा) डॉ. डोईफोडे :- वैद्यकीय अधिका-यांचे मानधन वाढविणे आवश्यक आहे.

वैद्यकीय अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :- वैद्यकीय अधिका-यांना रक्कम रु.२५,०००/- दरमहा मानधन करणे आवश्यक आहे.

मा.श्री. भोसले ग. पुं. :- मानधन कमी असल्यामुळे महानगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये चांगले डॉक्टर येण्यास तयार होत नाहीत. त्यांचे मानधन वाढवा. रक्कम रु.२५,०००/- मानधन केल्यास डॉक्टर येतील काय ?

मा.श्री. डागवाले कि.आ. :- आजचा प्रस्ताव हा फक्त वैद्यकीय अधिकारी यांचाच ठेवलेला आहे. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे भुलतज्ञांची आवश्यकता आहे. त्यांनाही मानधनावर घेणे बाबतचा प्रस्ताव ठेवण्यांत यावा.

वैद्यकीय अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथील नेमावयाच्या भुलतज्ञाचा वेगळा प्रस्ताव करावयाचा आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- वैद्यकीय अधिकारी यांचे मानधन वाढवावे.

मा.श्रीमती. कराळे आशाः- फिरता दवाखान्याची गाडी सावेडी विभागात येत नाही. आल्यानंतर त्यांचे मार्फत तेथील गोरगरीब रुग्णांना औषधे दिली जात नाहीत.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- फिरता दवाखाना हा संबंधित ठिकाणी गेल्यानंतर तेथील रुग्णांकडुन फी घेतात काय ?

मा.श्रीमती.मोहिनी लोंढे :- आमच्या विभागात फिरता दवाखान्याची गाडी आल्यानंतर प्रत्येक वेळी नविन केसपेपर काढणे बाबत सक्ती केली जाते.

वैद्यकीय अधिकारी डॉ.राजुरकर :- महानगरपालिका हद्दीतील दलित वस्तींमध्ये फिरता दवाखान्याचे पथक पाठविण्यांत येते. १५ दिवसातुन एकदा व्हीजीट दिली जाते. महिन्यातुन साधारणतः प्रत्येक दलित वस्तीत दोन वेळा व्हीजीट देण्यांत येते. एका वेळी केसपेपर काढलेला महिनाभर चालतो. पुन्हा काढण्याची आवश्यकता नसते.

मा.सौ. गंधे सु.मो. :- महानगरपालिकेत तांत्रिकपदी नियुक्त केलेल्या काही कर्मचा-यांन त्यांच्या मुळ पदापेक्षा पुर्णतः वेगळया स्वरूपाचे काम सोपविण्यांत आल्याचे आढळते हे नियमानुसार चुकीचे आहे. तरी तांत्रिकपदी नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना त्यांच्या पदानुसार काम देण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- आस्थापना विभागाने याबाबत आवश्यक ती नियमानुसार कार्यवाही करावी.

मा.सौ.गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.बोरूडे अ. व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना , रक्तपेढी विभाग तसेच फिरता दवाखाना या अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमावयाच्या वैद्यकीय अधिकारी / रक्त संक्रमण अधिकारी या पदांचे खाली दर्शविल्या नुसार मानधन वाढविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

| अ नं | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | सध्याचे कंत्राटी करारबध्द दरमहा मानधन | प्रस्तावीत कंत्राटी दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकरी | १५,०००/- | २५,०००/- |
| २. | वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी | २०,०००/- | २५,०००/- |
| ३. | वैद्यकीय अधिकारी | १०,०००/- | २०,०००/- |

ऑफिस रिपोर्ट मंजूर ,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही/-

अनुमोदक :- मा.श्री. बोरूडे अनिल वसंतराव. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७**

विषय क्रमांक- ३६ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

ठराव क्रमांक- ३६ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा व बांधकाम विभागाकडील अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमावयाच्या कनिष्ठ अभियंता या पदाचे दरमहा मानधन वाढविणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा आस्थापना विभाग जा.क्र.१६३ दिनांक ५/६/२०१२

प्रस्तावना-विषय- पाणी पुरवठा व बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदी करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढविणेबाबत.

सादर,

मा.मॅकेनिकल इंजि. पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी मागणी करून शहर व उपनगरामध्ये पाणी पुरवठा वितरणामध्ये वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने तसेच फेज-२ ची कामे करण्यांत येत असल्याने आस्थापना सुचीवर कनिष्ठ अभियंत्याची संख्या अपुरी आहे. त्यामुळे आवश्यकते प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर कनिष्ठ अभियंते तातडीने मिळणेबाबत सुचित केलेले आहे.

तसेच मा. शहर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख यांनी देखील बांधकाम विभागाकरिता कनिष्ठ अभियंतेची संख्या अपुरी असल्याने विविध विकास कामी तातडीने कार्यवाही करणेमध्ये अडचणी निर्माण होत आहे व त्याकामी तातडीने कंत्राटी करारानुसार दरमहा मानधनावर कनिष्ठ अभियंता मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

यापुर्वी पाणी पुरवठा विभाग व बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदी मानधनावर अटी व शर्ती नुसार दरमहा रूपये १०,०००/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती आयोजित करण्यांत येत असल्या बाबत वेळोवेळी वर्तमान पत्रामध्ये जाहिराती प्रसिध्दीस देण्यांत आलेल्या होत्या.

तथापि सदर प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने सदर मुलाखतीस वेळोवेळी उमेदवारांचा अत्यंत कमी प्रमाणात प्रतिसाद मिळालेला आहे.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७० दिनांक १०/१२/२०१० च्या ठरावामध्ये नमुद केल्याच्या अनुषंगाने कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदाचे दरमहा मानधन रूपये १०,०००/- इतके निश्चित करून वर्तमान पत्रामध्ये वेळोवेळी जाहिराती प्रसिध्दीस देण्यांत आलेल्या होत्या.

दि.१०/५/२०१२ रोजी मा. पदाधिकारी व प्रशासन यांचेमध्ये नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत करावयाच्या विकास कामाबाबत संयुक्त बैठक आयोजित करण्यांत आलेली होती.

त्या अनुषंगाने जा.क्र. सार्व. बांधकाम १९८ दिनांक १५/५/२०१२ च्या बैठकीतील चर्चेचा इतिवृत्तामध्ये मानधनावर इंजिनियर घेणेबाबत व त्यांचे मानधन वाढी बाबत आस्थापना विभागाने रूपये १५,०००/- पर्यत करणेबाबत कार्यवाही करावी असे त्यामध्ये नमुद करून निर्देशित करण्यांत आलेले आहे.

आस्थापना कायम सुची वरील कनिष्ठ अभियंता या पदास नव्याने कायम नियुक्ती वेळेस त्यांचे सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी नुसार सद्यस्थितीत अंदाजे दरमहा रूपये २४,२००/- इतके वेतन अदा होईल.

पाणी पुरवठा विभाग व बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदांवर आवश्यकते नुसार कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधन वाढी बाबत मा.स्थायी समितीच्या मंजुरी प्राप्ती नंतर सदर कंत्राटी कनिष्ठ अभियंता या पदाचे दरमहा मानधन नमुद करून थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती करीता वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देणे उचित होईल.

तरी मा. मॅकेनिकल इंजि. पा.पु.विभाग प्रमुख व मा.प्र.शहर अभियंता बांधकाम विभाग प्रमुख यांनी सुचित केल्याच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग व बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी आवश्यक त्या प्रमाणात कनिष्ठ अभियंत्याची तातडीने आवश्यकता असल्यामुळे कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदाचे दरमहा मानधन रू.२०,०००/- पर्यत निश्चित करणे बाबतचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा व बांधकाम विभागाकडील अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमावयाच्या कनिष्ठ अभियंता या पदाचे दरमहा मानधन वाढविणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा व बांधकाम विभागाकडील अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात नेमावयाच्या कनिष्ठ अभियंता या पदाचे दरमहा मानधन वाढवून रूपये २०,०००/-(रूपये वीस हजार फक्त) निश्चित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बोरूडे अनिल वसंतराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>सभापती,<br>स्थायी समिती<br>अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७**

विषय क्रमांक- ३७ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

ठराव क्रमांक- ३७ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी डॉ. श्री. सुरेश विलास घोलप यांची कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा आस्थापना विभाग जा.क्र. १७९ दिनांक २२/६/२०१२

प्रस्तावना-विषय- फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

सादर,

प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा. दे. दवा. व सुतिका गृह १२२ दिनांक ७/५/२०१२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने अहमदनगर शहरामध्ये फिरता दवाखाना सुरू करण्यांत आलेला आहे.सदर फिरता दवाखान्यामुळे दारिद्रय रेषे खालील व गलीच्छ वस्तीत जाउन आरोग्य बाबत जनजागृती व नागरिकांना आरोग्य सेवा पुरविली जाते. सदरच्या फिरत्या दवाखान्या करीता डॉ. सुरेश विलास घोलप यांची जा.नं. आस्था./ कंत्राटी २७०८ दिनांक १९/१२/२०११ अन्वये सहा महिन्याकरीता वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करार पध्दतीने नेमणूक करण्यांत आलेली होती. सदर आदेशाची मुदत दिनांक १९/६/२०१२ रोजी संपुष्टात येत आहे. त्यांनी आता पर्यत केलेल्या कामाचा तपशिल सोबत जोडून दिलेला आहे. अहमदनगर महानगरपालिकेत वैद्यकीय अधिका-याची आवश्यकता आहे. वरील कालावधीत व याआधी दिलेल्या नेमणूकीच्या कालावधीत डॉ. सुरेश विलास घोलप यांचे काम समाधानकारक आहे. त्यांना नियमाप्रमाणे पुर्ननेमणूक देणे बाबत" नमुद करून सुचित केलेले आहे.

तरी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह १२२ दिनांक ७/५/२०१२ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची जा.क्र. आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक १३५८ दिनांक १५/०६/२०१२ अन्वये तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर नेमणूक आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये १०,०००/- (अक्षरी रूपये दहा हजार मात्र) या मानधनावर दिनांक २२/०६/२०१२ पासून सहा महिन्याकरीता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे फिरता दवाखाना या अत्यावश्यक सेवेसाठी डॉ. श्री. सुरेश विलास घोलप यांची कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी मानधनावर केलेल्या नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- डॉ.श्री.सुरेश विलास घोलप यांची किती कालावधी साठी नेमणुक केलेली आहे.

आस्थापना प्रमुख श्री.सोनवणे:- डॉ.श्री.सुरेश विलास घोलप यांची फिरत्या दवाखान्या करीता कंत्राटी करारानुसार सहा महिन्यांच्या कालावधी करीता तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक केलेली आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- सहा महिन्यांचा कालावधी हा अतिशय कमी होत असल्याने यापुढे सहा महिन्या ऐवजी ११ महिने मुदतवाढ करणे बाबतचा प्रस्ताव ठेवण्यांत यावा.

मा.उपायुक्त(सा)डॉ.डोईफोडे :-यापुढे११महिने कालावधीसाठी नेमणुकी बाबतचा प्रस्ताव ठेवण्यांत यावा.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.बोरूडे अ.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना या अत्यावश्यक सेवेसाठी डॉ. श्री. सुरेश विलास घोलप यांची कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर दिनांक २२/०६/२०१२ पासून सहा महिन्याकरीता केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बोरूडे अनिल वसंतराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७**

विषय क्रमांक- ३८ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

ठराव क्रमांक- ३८ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-**महासभा ठराव क्र.१२दिनांक ११/०७/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP)अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती करीता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा प्रकल्प विभाग जा.क्र.-३२ दिनांक २७/७/२०१२

विषय- एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC)नियुक्तीकरीता मागविण्यांत आलेल्या निविदा बाबत निर्णयास्तव.

संदर्भ :- मा.आयुक्त यांची दिनांक ५/६/२०१२ रोजीची मान्यता.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये अहवाल सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) राबविणेकरीता (PMC) नियुक्ती बाबत फेर ई - निविदा मागविली असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ..क्र. | निविदा धारकाचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | आर्क असोसिएटस, औरंगाबाद | ३.३३%+ सर्व्हिस टॅक्स |
| २ | महेंद्र दवे ॲण्डअसोसिएटस, अकोला | ३.९९% |
| ३ | सिमा कंन्सलटंट,औरंगाबाद | ४.१३%+ सर्व्हिस टॅक्स |

त्यानुसार वरील तुलनात्मक तक्त्यामधील सर्वात कमी दर असलेले आर्क असोसिएटस, औरंगाबाद या एजन्सीस वाटाघाटीसाठी बोलविले असता सदर एजन्सीने वाटाघाटी नंतर २.७५%+ सर्व्हिस टॅक्स या दराने काम करणेस तयार असलेबाबत कळविले.

सदर बाबत अहवाल दिनांक ५/६/२०१२ रोजी छाननी समितीकडे सादर केला असता छाननी समितीने आर्क असोसिएटस औरंगाबाद यांचा देकार २.७५%+ सर्व्हिस टॅक्स मंजुर करणे बाबत शिफारस केली आहे. सदरच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत नालेगांव स.नं. २२०,२२१ व मोरचुदनगर स.नं. ५ येथे ४८० सदनिका व मुलभूत सुविधा प्रकल्प रक्कम १३.२० कोटी व नालेगांव स.नं.४१/२ अ पैकी येथे ३७२ सदनिका व मुलभूत सुविधा प्रकल्प रक्कम १२.३६ कोटी इतकी आहे.

सदरचा प्रस्ताव दिनांक ११/७/२०१२ रोजीच्या मा.महासभेपुढे सादर केला असता ठराव क्रमांक १२ दिनांक ११/७/२०१२ अन्वये IHSDP अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती करीता मागविण्यांत आलेला निविदा दराचा तुलनात्मक तक्ता मा.स्थायी समिती कडे निर्णय घेणे कामी पाठविण्यास मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करावी असा ठराव पारित करण्यांत आला.

तरी प्राप्त निविदा बाबत निर्णय घेणेस्तव मा.स्थायी समिती समोर सविनय सादर.

येणेप्रमाणे प्रकल्प अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती बाबत प्रस्ताव आहे. ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- सदरचा विषय हा दिनांक ११/ ०७/२०१२ च्या महासभेमध्ये घेण्यांत आला होता. सदरचा विषय हा सभेत मंजूर न होता मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यांत आलेला आहे. मनपाचे कामामध्ये PMC नियुक्तीचा अनुभव अतिशय वाईट आहे. आर्क असो. यांचे निविदा दर सर्वात कमी आहेत. परंतु त्यांनी सेवाकर लावलेला आहे या कामापोटी त्यांना किती रक्कम द्यावयाची त्याचा बोध होत नाही. ज्या संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नियुक्ती करावयाची आहे. त्यांना महानगरपालिकेने कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी. त्या बदल्यात संबंधित संस्थेकडुन भाडे आकारणी करण्यांत यावी. सदरची संस्था जे अभियंते कर्मचारी यांची नगरपालिकेच्या कामकाजासाठी नियुक्ती करणार आहे. त्यांची संख्या निश्चित करण्यांत यावी. त्यांची नांवे,पत्ते, दूरध्वनी क्रमांक कार्यालयामध्ये फलकावर लावण्यांत यावीत. संबंधित संस्थेचे मनपा जागेत कार्यालय असावे. संस्थेचा माहितगार अधिकारी / कर्मचारी त्यांचे कार्यालयात पुर्णवेळ राहील अशी व्यवस्था करण्यांत यावी. त्यांचे कार्यालयात कामकाजासंदर्भात सर्व कागदपत्रे उपलब्ध ठेवणे बंधनकारक करण्यांत यावे. सदर संस्थेच्या कामात जर काही दोष त्रुटी आढळल्या तर सदर संस्थेस जबाबदार धरून कार्यवाही करण्यांत येईल. या सर्व प्रकारच्या अटी शर्ती टाकुन करारनामा करण्यांत यावा.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- एकुण किती रक्कम सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेस द्यावी लागेल.

प्रकल्प अभियंता श्री. मेहेत्रे :- एकात्मीक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत नालेगांव सर्व्हे नंबर २२०,२२१ व मोरचुद नगर सर्व्हे नंबर ५ येथे ४८० सदनिका व मुलभुत सुविधा प्रकल्प रक्कम १३.२० कोटी व नालेगांव सर्व्हे नंबर ४१/२ अ पैकी येथे ३७२ सदनिका व मुलभुत सुविधा प्रकल्प रक्कम १२.३६ कोटी इतकी आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं. व मा.सौ. खरमाळे सं.र. :- सदर प्रकल्प सल्लागार समितीला महानगरपालिके मार्फत कुठलाही सर्व्हीस टॅक्स देण्यांत येवू नये.

मा.सभापती साहेब :- मा.शासनाने महानगरपालिकेस सर्व्हीस टॅक्स पोटी काही रक्कम दिली तरच संबंधित सल्लागार संस्थेला सर्व्हीस टॅक्स देण्यात येईल. महानगरपालिका सर्व्हीस टॅक्स पोटी कोणतीही रक्कम देणार नाही असे ठरवावे.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- सदर सल्लागार एजन्सीला वाटाघाटीसाठी बोलाविण्यांत यावे. संबंधित संस्था वाटाघाटी करणार नाही काय.

प्रकल्प अभियंता श्री.मेहेत्रे :- निविदेमध्ये एजन्सीने त्यांचे दर नमुद केले. त्यानुसार आजचा हा प्रस्ताव सभेपुढे मंजूरी साठी ठेवलेला आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- सदर घरकुलांची जागा N.A. झालेली नाही.

प्रकल्प अभियंता श्री.मेहेत्रे :- जागा N.A. करणे बाबतची कार्यवाही संबंधित सल्लागार संस्थेमार्फत करुन घ्यावयाची आहे.

नगररचनाकार श्री.दहे :- जागा विकसित करणे बाबतची परवानगी द्यावयाची आहे. जागा N.A.करणे बाबतची कार्यवाही सल्लागार संस्था यांचेमार्फत करणे आहे.

मा.सौ.खरमाळे सं.र.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. सर्व्हिस टॅक्स मंजूर करू नये.

मा.श्री. कवडे उ.खं. :- सर्व्हिस टॅक्स वगळून कमीचे दर मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- आलेले कमीचे दर मंजूर करावे. सर्व्हिस टॅक्स पोटी शासनाकडून काही रक्कम मिळाली तरच सर्व्हिस टॅक्स मंजूर करावा.ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP)अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार(PMC) नियुक्ती करीता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दरधारक आर्क असोसिएटस, औरंगाबाद यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या २.७५%(दोन पूर्णांक पंच्याहत्तर शतांश टक्के) चे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. मात्र कमीचे निविदा धारक यांनी सर्व्हिस टॅक्सची केलेले मागणी मा. शासन सदरचे सर्व्हिस टॅक्सची रक्कम देणार असेल तर मान्य करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७**

विषय क्रमांक- ३९ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

ठराव क्रमांक- ३९ मंगळवार दिनांक १४/०८/२०१२

**प्रस्तावाचा विषयः-**अहमदनगर महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रामध्ये (बाहय रूग्ण विभाग) कार्यानुभव व प्रात्यक्षिका करिता अहमदनगर जिल्हयातील व नगर शहरातील विविध नर्सिंग इन्स्टिटयूट प्रशिक्षणार्थीना परवानगी देणेस व त्यांच्या कडून प्रती दिन प्रती विद्यार्थी फि ठरविणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह दिनांक ७/५/२०१२

विषय- विविध नर्सिंग इन्स्टिटयूटच्या विद्यार्थीनींना अहमदनगर महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रामध्ये (UPH) प्रात्यक्षिक अनुभवासाठी परवानगी देणेबाबत व त्याकरिता योग्य फी आकारणी बाबत.

संदर्भ :- सावली स्कुल ऑफ नर्सिंग , टाकळी ढोकेश्वर ता. पारनेर जि. अहमदनगर यांचे दिनांक १५/०३/२०१२ चे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार विनंतीपुर्वक रिपोर्ट देण्यांत येतो की, सावली स्कुल ऑफ नर्सिंग, टाकळी ढोकेश्वर ता. पारनेर जि. अहमदनगर यांनी दि.१५/०३/२०१२रोजी पत्र देउन अहमदनगर महानगरपालिकेच्या तोफखाना दवाखाना येथे त्याच्या संस्थेच्या आर.ए.एन.एम.च्या विद्यार्थीनींना प्रात्यक्षिक अनुभवासाठी परवानगी मागितलेली आहे. तसेच विविध नर्सिंग इन्स्टिटयूट वरीलप्रमाणे मनपा आरोग्य केंद्रामध्ये विद्यार्थीनींना प्रात्यक्षिक अनुभव मिळणे कामी परवानगी मागत असतात.

सध्या अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे अहमदनगर जिल्हयातील व नगर शहरातील नर्सिंग इन्स्टिटयूटचे विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रसुती व स्त्रीरोगाबाबत कार्यानुभवासाठी व प्रशिक्षणासाठी दरवर्षी येत असतात. त्यांच्याकडून शासन निर्णय क्रमांक एमईडी-२००९ सीआ-१२३ /०९ शिक्षण-१ वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई-३२ दिनांक २५ ऑगस्ट २००९ अन्वये प्रशिक्षणार्थीना प्रसुती व स्त्री रोगाबाबत अनुभव घेण्यासाठी प्रति विद्यार्थी / प्रति दिन / प्रति खाट रू.१०/- प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन दोन खाटासाठी रू.२०/- प्रमाणे सर्व संस्थेकडून शुल्क आकारणी करणेत येत आहे.

परंतु वरील शासन निर्णयामध्ये आरोग्य केंद्रामध्ये (बाह्यरूग्ण विभागात) RGNM व RANM प्रशिक्षणार्थींकडून प्रात्यक्षिक व कार्यानुभवासाठी किती फी आकारावी याबाबत उल्लेख केलेला नाही.

तरी अहमदनगर जिल्हयातील व नगर शहरातील विविध नर्सिंग इन्टियटयूटच्या प्रशिक्षणार्थीना मनपाच्या आरोग्य केंद्रामध्ये (बाह्यरूग्ण विभाग ) कार्यानुभव व प्रात्यक्षिकाकरिता परवानगी देणेस व त्यांच्याकडून त्याबाबत किती फी आकारावी याबाबत प्रस्ताव निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर एम.ओ.एच. यांचा अभिप्राय की,"अ"प्रमाणे सावली स्कुल ऑफ नर्सिंग व इतर वेळोवेळी अर्ज करणा-या नर्सिंग संस्था यांना मनपाच्या नागरी आरोग्य केंद्र / दवाखाना येथे अनुभवा साठी अर्ज दाखल व परवानगी देणेबाबत मा.स्थायी समिती कडून निर्धारित केलेली शुल्क आकारणी करून अधिकार मुख्यवैद्यकीयअधिकारी कै.बा.देशपांडे दवाखाना यांना मा.उपायुक्त(कर)यांचे मान्यतेप्रमाणे कायम स्वरूपी देणे उचित वाटते तसेच बाह्यरूग्ण ओपीडीसाठी अनुभवासाठी शुल्क आकारणी बाबत मा.शासनाकडून योग्य निर्देश नसल्याने याबाबत आंतररूग्ण(हॉस्पीटल) अनुभवासाठी जितके शुल्क आकारणे जाते उदा- प्रतिदिन प्रतिविद्यार्थी १०/- रू.त्याचप्रमाणे ५०% शुल्क आकारणे योग्य वाटते.मात्र सदर बाब निर्णयास्तव व मान्यतेस्तव मा.स्थायीसमितीपुढे विषय घेणेस पुढील कार्यवाहीस्तव सादर.

यावर मुलेप/मुलेअ यांचा अभिप्राय की,वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचे अभिप्रायाप्रमाणे बाह्यरूग्ण विभागात आरोग्य केंद्रामध्ये नर्सिंग इन्स्टिटयुटचे प्रशिक्षणार्थी विदयार्थीनीकडुन प्रशिक्षणाकरिता फी आकारणीबाबत निर्णयास्तव मा.स्थायीसमितीसमोर ठेवणेस मान्यतेकरिता आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त(कर) यांचा अभिप्राय की, डॉ.राजूरकर कृ. चर्चा,प्रस्तावानुसार OPDसाठी रू.५/-दर/प्रतिदिन/प्रतिविदयार्थी ठरविणेबाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही दि.६/८/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- आरोग्य केंद्रामध्ये (बाहय रूग्ण विभाग) कार्यानुभव व प्रात्यक्षिका करिता अहमदनगर जिल्हयातील व नगर शहरातील विविध नर्सिंग इन्स्टिटयूट प्रशिक्षणार्थीना शुल्क आकारून परवानगी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठरावः-</u>**अहमदनगर महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रामध्ये (बाहय रूग्ण विभाग)कार्यानुभव व प्रात्यक्षिका करिता अहमदनगर जिल्हयातील व नगर शहरातील विविध नर्सिंग इन्स्टिटयूटच्या प्रशिक्षणार्थीना प्रती दिन प्रती विद्यार्थी रू. ५/-(रूपये पांच फक्त) प्रमाणे शुल्क आकारून परवानगी देणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बोरूडे अनिल वसंतराव सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका